पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/०८/२०१४** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शनिवार दिनांक **१६/०८/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
६) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
७) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
८) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
९) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे, मा.ढेरे - सहा.आयुक्त, मा.पवार - कार्यालय अधिक्षक, मा.साळवी, मा.पिरजादे - कार्यकारी अभियंता, मा.पाटील - प्रशासन अधिकारी (आस्था) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.७) कामाचे स्थान बदलणेबाबत - मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) अंदाजपत्रक सन २०१४-१५ मध्ये स्थापत्य विषयक कामाचा समावेश व तरतूद करणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) सुधारित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) प्रस्तावात नमुदप्रमाणे सुधारित खर्चास मंजूरी देणेबाबत - मा.शकुंतला बनसोडे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक ०२/०८/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

**----------**

ठराव क्रमांक : ९ | विषय क्रमांक : १
दिनांक : १६/०८/२०१४ | विभाग - स्थापत्य बीआरटीएस
सुचक : मा.वसंत लोंढे | अनुमोदक - मा.संजय वाबळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बीआरटीएस/२९६/२०१४, दि.२०/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नाशिक फाटा ते मोशी मुख्य रस्त्याचेकडेने गंधर्वनगरी येथे सेवा रस्त्याचे काम सध्या चालू असलेल्या देहू ते आळंदी रस्त्याची सुधारण करणे टप्पा क्र.२ मोशी जाधववाडी हद्द ते आळंदीगाव साखळी क्र.८/२५० कि.मी. ते १५/०५० कि.मी. निविदा क्र.जी१/४७/२/२०११-१२ कामामधून करणेचे स्थळ बदल प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १० | विषय क्रमांक : २
दिनांक : १६/०८/२०१४ | विभाग - फ क्षेत्रीय अतिक्रमण
सुचक : मा.प्रभाकर वाघेरे | अनुमोदक - मा.समीर मासुळकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/अति/कावि/२०५/२०१४, दि.२६/०६/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

फ क्षेत्रिय कार्यालयाचे अतिक्रमण विभागासाठी टाटा **LPT** 407/34/BS4 वाहन खरेदी करणे व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.११,७१,४८२.७५ (अक्षरी र.रु.अकरा लाख एक्काहत्तर हजार चारशे ब्याऐंशी पैसे पंच्याहत्तर फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ११ | विषय क्रमांक : ३
दिनांक : १६/०८/२०१४ | विभाग - इ क्षेत्रीय स्थापत्य
सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे | अनुमोदक - मा.विमल जगताप
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इस्था/कावि/५९३/२०१४, दि.१६/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३२ सँडविक कॉलनी, सावंतनगर, महादेवनगर परिसरात रस्त्याचे कडेने पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी येणा-या अंदाजे र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) चे सुधारित पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२ विषय क्रमांक : ४

दिनांक : १६/०८/२०१४ विभाग - इ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक - मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इस्था/कावि/६००/२०१४, दि.१८/०७/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.६ मोशी येथे मंडप व्यवस्था व त्या अनुषंगिक कामे करणेकामी येणा-या अंदाजे र.रु.१७,३३,७७२/- (अक्षरी र.रु.सतरा लाख तेहतीस हजार सातशे बहात्तर फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३ विषय क्रमांक : ५

दिनांक : १६/०८/२०१४ विभाग - फ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/फक्षेका/काअ/कावि/४९३/२०१४, दि.०४/०८/२०१४

विषय - प्रभाग क्र.५ मध्ये अतिक्रमण कारवाईसाठी क्रेन व जे.सी.बी. पुरविणे (सुधारित प्रशासकीय मान्यता)

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १४ विषय क्रमांक : ६

दिनांक : १६/०८/२०१४ विभाग - इ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक - मा.संजय वाबळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इस्था/कावि/६७१/२०१४, दि.०२/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे बो-हाडेवाडी या ठिकाणी गायराना लगतचा १८.०० मी डी.पी.रस्ता करुन मिळणेबाबत स्थानिक नगरसदस्य यांनी विनंती केली आहे. प्रत्यक्ष जागा पाहणी केली असता रस्त्याचे जुने भैरवनाथाचे मंदिर असल्याचे निदर्शनास आले आहे. मा.सदस्य व मा.आमदार श्री.विलास विठोबा लांडे यांनी दि.३०/०६/२०१४ रोजी प्रत्यक्ष जागेवर भेट देऊन बनकर वस्ती येथील नागरिकांच्या सोईसाठी मंदिराच्या मागे ६.०० मी. गायरानातून रस्ता करणेचे सुचित केले आहे. त्यामुळे सुमारे ३० ते ४० घरांना रस्त्याची सोय होणार आहे. सदर रस्ता करावयाचा झाल्यास त्या रस्त्यासाठी सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामध्ये तरतूद नाही. मा.नगरसदस्य यांनी त्यांचे पत्र दि.०४/०७/२०१४ अन्वये बो-हाडेवाडी गायरानातून नागरिकांच्या सोईसाठी सदर रस्त्याचे काम आवश्यक असल्याने डूडूळगांव येथील विकास आराखडयातील रस्ते खडीमुरुमाचे करणे (जुने गट १९२ ते २४०) नि.क्र.१९/९-२०१२/१३ हे याकामातून करणेबाबत विनंती केली आहे. डूडूळगांव येथील काम हे १८.०० मी. डी.पी.रस्त्याचे असून या रस्त्यावरील मनपाच्या ताब्यात आलेल्या क्षेत्राचे काम पुर्ण झाले आहे व उर्वरित काम स्थानिक जागा मालकांनी अद्याप मनपाच्या ताब्यात जागा न दिल्याने करता येत नाही. त्यामुळे उर्वरित रकमेतून बो-हाडेवाडी येथील ६.०० मी. रस्ता व प्रभाग क्र.६ मोशी येथील अंतर्गत रस्त्याचे काम करणेस

मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १५ विषय क्रमांक : ७

दिनांक : १६/०८/२०१४

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक - मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्रमांक ६० मध्ये बळवंत कॉलनी ते पवना नदी पर्यंत नाला बांधणेचे काम प्रभाग क्र.२० ऐवजी प्रभाग क्र.२३ मध्ये करुन घेण्याच्या स्थान बदलाच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १६ विषय क्रमांक : ८

दिनांक : १६/०८/२०१४

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.वसंत लोंढे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सन २०१०-११ मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदा नोटीस मधील निविदा नोटीस क्र.१/२१-२०१०-११ " सांगवी वॉर्ड क्र.९१ येथील स्मशानभूमीमध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे " हे काम अंदाजपत्रक सन २०१३-१४ मधून वगळले होते. त्यामुळे सदर चालू स्थितीतील असलेल्या कामाकरिता तरतूद नसल्याने सदर काम अंतिम स्वरुपात करणे शक्य झाले नाही. सदर काम पुर्ण झाल्याने या कामाची अंतिम अदायगी देणेकामी सदर कामाचा समावेश व याकरीता र.रु.२,५०,०००/- (अक्षरी र.रु.दोन लाख पन्नास हजार फक्त) इतकी तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजपत्रक सन २०१४-१५ मध्ये लोकारोग्य-स्मशानभूमी या लेखाशिर्षा अंतर्गत सदर कामाचा समावेश व तरतूद उपलब्ध होण्यासाठी सांगवी गावठाण वॉर्ड क्र.६० मधील " प्रभाग क्र.६० सांगवी येथील गणपती विसर्जन घाटावर निर्माल्य कलश व कृत्रिम हौद व अनुषंगिक कामे करणे " (पान क्र.२४९/अनु.क्र.६) या कामातून तरतूद वर्ग करण्यास व सदर कामाचा अंदाजपत्रक सन २०१४-१५ नव्याने समावेश करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १७ विषय क्रमांक : ९

दिनांक : १६/०८/२०१४

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक - मा.विमल जगताप

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे नव्याने विकसीत झालेल्या " आई " उद्यान दापोडी येथील उद्यानामध्ये माळी हाऊस बांधणे, वॉल कंपाऊंड बांधणे, इ. स्थापत्य विषयक कामे करणेकरीता रक्कम रुपये ५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) च्या सुधारित खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १८ विषय क्रमांक : १०

दिनांक : १६/०८/२०१४

सुचक : मा.शकुंतला बनसोडे अनुमोदक - मा.विमल जगताप

संदर्भ : मा.शकुंतला बनसोडे, मा.विमल जगताप यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.५ मधील नेवाळेमळा येथे गटर्स करणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१अ/कावि/६८१/२०१३, दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३६.३२९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ मधील बोल्हाईमळा व शिवरस्ता येथे गटर्स करणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१अ/कावि/६७६/२०१३, दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३५.२४९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ मधील सेक्टर क्र. १३ व १६ भागात येथे गटर्स करणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१अ/कावि/६७५/२०१३, दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३५.२४९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच जाधववाडी, कुदळवाडी भागातील मुख्य रस्त्याच्याकडेने गटर्स करणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१अ/कावि/६७९/२०१३, दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३६.३२९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ मधील जाधववाडी, कुदळवाडी भागात स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१अ/कावि/ ६७७/२०१३, दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३६.३२९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड

व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ मधील नेवाळेवस्ती, हरगुडेवस्ती येथे गटर्स करणेचे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/नि/१३अ/ कावि/६७८/२०१३,दि.१९/१२/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.२१,००,८२५/- इतकी आहे व निविदा दर ३६.३२९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ ठिकठिकाणी मंडप व्यवस्था करणे कामाचे आदेश मे.कुबेरा एन्टरप्राईजेस यांना आदेश क्र.अप्रस्था/कावि/१०१०/२०१४, दि.१२/११/२०१३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे कामाची निविदा र.रु.७,००,२७९/- इतकी आहे व निविदा दर ५.५४९% कमी आहे. तरी सदर कामाची निकड व आवश्यकता पाहता सदरचे कामाचा सुधारित खर्च र.रु.४९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख फक्त) यास भाववाढ फरकासह मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.६३ मध्ये रेल्वे गेट ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत नाला करणे या कामास सुधारित प्रशासकीय मान्यतेचे र.रु.४९,५३,३५३/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६८९/२०१४
दिनांक : २६/०८/२०१४

**कार्यालय अधिक्षक**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.